नि.फौ.ख.क्र. १२०/२०२३
सरकार वि. संजय वगैरे
निशाणी ३१

## अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.१ यांची साक्ष

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

**माझे नाव** :– धोंडीराम संभाजी गायकवाड
**वय** :– ४२ वर्षे, **धंदा** :– सेवानिवृत्त (आर्मी)
**राहणार** :– शेटफळे, ता. आटपाडी, जि. सांगली.

## सरतपासणी अभियोगपक्षातर्फे – श्रीमती ए.पी.केसकर, विद्यमान सहा. सरकारी वकील यांचेमार्फत

**०१.** माझ्या घरी माझी मी, माझी पत्नी सुवर्णा, माझ्या तीन मुली, आई सुमन, वडील संभाजी, भाऊ बाळासाहेब, माझी वहिणी प्रियंका व त्यांची दोन मुले असे एकत्र राहतो. माझे मुळ गांव शेटफळे आहे.

**०२.** घटना दिनांक ०६/०६/२०२१ रोजी सायंकाळी ५.०० सुमारास घडली होती. सदर दिवशी मी आमच्या स्वतःच्या शेतात शेळया चारत असताना, संजय रामराव गायकवाड , त्यांची पत्नी मनिषा संजय गायकवाड, वडील रामराव लक्ष्मण गायकवाड हे मेन रोडला गाडी लावून खाली उतरुन माझ्याकडे आले व माझ्यासोबर वादावाद सुरु केला, शिवीगाळी केली. रामराव गायकवाड व मनिषा गायकवाड यांनी दगड मारण्यास सुरवात केली व या शेतजमीनीत यायचे नाही अशी धमकी दिली. नंतर विजय रामराव गायकवाड, त्यांची पत्नी वैशाला विजय गायकवाड हे मोटारसायकलवरुन मेन रोडला गाडी लावून शेतामध्ये आले व त्यांनी मला शिवीगाळी करुन दगड मारण्यास सुरवात केली.

**०३.** तेथून काही अंतरावर माझे शेळया–मेढयांचे शेड आहे. मी शेडमध्ये शेळयांना बंद केले आणि त्यांना काहीही न बोलता गावामध्ये माझ्या राहत्या घरी आलो. त्यानंतर संध्याकाळी ८.०० सुमारास मी घरी बसलो असता, संजय रामराव गायकवाड, विजय गायकवाड, रामराव गायकवाड, मनिषा गायकवाड, वैशाली गायकवाड हे सर्व आरोपी एकत्र मिळून हातामध्ये काठ्या, कु–हाडी घेवून घरी आले व वादावादी सुरु

केली. संजय गायकवाड यांनी त्यांच्या हातातील कु–हाडीने माझ्या डोक्याच्या उजव्या बाजूला मारले. रामराम गायगवाड यांनी काठीने पाठीत मारहाण केली व मी जखमी झालो. विजय गायकवाड यांनी माझा भाऊ बाळासाहेब गायकवाड याच्या डोक्यात व नाकावर काठीने मारहाण केली व माझे वडील संभाजी गायकवाड यांना काठीने व लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. मनिषा गायकवाड व वैशाली गायकवाड यांनी माझी आई, पत्नी व भावजय यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण केली व शिवीगाळ केली. आमच्या भांडणाचा गोंधळ ऐकून आमच्या भावकीतील लोकांनी सोडवासोडव कली. भारत रावसाहेब पाटील व शहाजी दगडू पाटील यांनी भांडणाची सोडवासोडव केली.

०४. त्यानंतर जखमी झालेल्या अवस्थेत आटपाडी पोलीस स्टेशनमध्ये आलो व मी तक्रार दिली. पोलीसांनी मला यादी देवून उपचाराकामी सरकारी दवाखाना आटपाडी येथे पाठविले. आटपाडी येथील डॉक्टरांनी माझ्या डोक्यामध्ये टाके घातले व त्यादिवशी निरीक्षणाकरीता थोडा वेळा दवाखान्यात ठेवले. डॉक्टरांनी मला दुस–या दिवशी संगली येथील सरकारी दवाखान्यात सिटी स्कॅन करण्याकरीता जाण्याचा सल्ला दिला. माझ्या भावाच्या नाकातून सतत रक्तस्त्राव होत असल्याने त्याला देखील डॉक्टरांनी सीटी स्कॅन करण्याचा सल्ला दिला. आटपाडी दवाखान्यातील डॉक्टरांनी सांगली येथील डॉक्टरांच्या नावे एक पत्र दिले होते. त्यानंतर आम्ही पुन्हा पोलीस स्टेशनला गेलो. पोलीस स्टेशनमध्ये आमचा पोलीसांनी वर्दी जबाब घेतला. आता मला फिर्याद दाखवण्यात आली त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. फिर्यादला **निशाणी ३२** देण्यात येते. आता मला छापील प्रथम खबर दाखविण्यात आली. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे त्यास **निशाणी ३३** देण्यात येते.

०५. न्यायालयाने माझा जबाब नोंदविला नव्हता. साक्षीदार पुन्हा सांगतात की, मला आणि माझ्या भावजयला न्यायालयात बोलाविले होते व माझा जबाब न्यायालयामध्ये नोंदविला होता. आता मला न्यायालयासमक्ष झालेला माझा जबाब दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास

**निशाणी ३४** देण्यात येते.

**उलटतपास आरोपीतर्फे – श्री. जे.एम. महामुनी, विद्यमान वकील यांच्यामार्फत सुरु**

**०६.** हे म्हणणे खरे आहे की, शेटफळचे ग्रामदैवत सिद्धनाथ आहे. हे म्हणणे खरे आहे की, शेटफळे येथील पाटीलवाडा, विर सावरकर चौक येथे आमची घरे आहेत. पाटील वाड्यामध्ये अंदाजे शंभर घरे असावीत. हे म्हणणे खरे आहे की, गावातील घरे एकमेकांना चिकटून आहेत. हे म्हणणे खरे आहे की, काही ठिकाणी दोन घरांच्यामध्ये जाण्याकरीता चार–पाच फुटाचे बोळ आहेत. हे म्हणणे खरे आहे की, पाटील वाड्यामध्ये आप्पा मास्तर, दगडु गायकवाड व भगवान गायकवाड, गणपती गायकवाड व कोळी समाजाच्या लोकांची घरे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या घरासमोर सोन्या–चांदीचे दुकान आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्याठिकाणी सी.सी.टी.व्ही. कॅमेरा आहे. साक्षीदार सांगतात की, आता बसविले आहेत.

**०७.** माझ्या पंजोबाचे नाव मारुती आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे पंजोबा दत्तक आले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, पाटील वाड्यापासून शेतजमीनी दीड ते दोन कि.मी. लांब आहेत. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या आजोबाचे आणि रामरावच्या वडीलांचे एक आड एक जमीनींचे वाटप झाले होते. हे म्हणणे खरे आहे की, जमीनीचे हिस्से आणि वहिवाटी स्वतंत्र आहेत. एकत्रीकरणाच्या वेळी गट क्र. ११२३ हा ११२४ ला जोडल्याबाबत मला माहिती आहे. हे म्हणणे खरे नाही की, एकत्रीकरणाबाबतच्या तक्रारी सांगली, आयुक्त कार्यालय, मंत्रालय येथपर्यंत रामरावच्या हक्कात झाल्या. हे म्हणणे खरे नाही की, मुंबई उच्च न्यायालयातून ते प्रकरण आटपाडी येथे कब्जा देण्यासाठी परत आले. हे म्हणणे खरे नाही की, रामरावच्या हक्कामध्ये सातबारा दुरुस्त करा असा आदेश झाल्याने त्याप्रमाणे सातबारामध्ये दुरुस्ती झाली आहे. हे म्हणणे खरे नाही की, दुरुस्ती आदेश रामरावसारखा झाला आहे.

**०८.** आम्ही मंत्रालयामध्ये अपील दाखल केले आहे. आम्ही उच्च न्यायालयात वकील दिले होते. उच्च न्यायालयात आमचे अपील फेटाळण्यात आले आहे. उच्च न्यायालयाच्या आदेशाविरुद्ध आम्ही सर्वोच्च न्यायालयात अपील दाखल केलेले नाही. हे

**नि.फौ.ख.क्र. १२०/२०२३**
**सरकार वि. संजय वगैरे**
**निशाणी ३१**

म्हणणे खरे आहे की, वीस गुंठ्याकरीता आमच्यामध्ये व आरोपीमध्ये वाद आहेत.

**०९.** हे म्हणणे खरे आहे की, सातबारा उता–यावरील आमची व आरोपींची आणेवारी वेगवेगळी आहे. हे मला माहिती नाही की, रामराव गायकवाड यांची बायपास सर्जरी झाली आहे किंवा कसे. हे म्हणणे खरे नाही की, वैशाली व विजय हे नेरुळ, मुंबई येथे राहतात. हे म्हणणे खरे आहे की, वैशाली व विजय आणि संजय व मनिषा हे नोकरीनिमीत्त परगावी असतात. लॉकडाऊन अंदाजे २०२० –२१ मध्ये होते. मला लॉकडाऊन सुरु झाल्याची निश्चित तारीख सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, लॉकडाऊनमध्ये लोकांना ये–जा करण्यास प्रतिबंध होता.

**आरोपींच्या वकीलांच्या विनंतीवरुन उर्वरित उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब.**

श्रवणोत्तर स्विकृती,
समक्ष

RAHUL BHALCHANDRA KULKARNI
Digitally signed by RAHUL BHALCHANDRA KULKARNI
Date: 2025.04.22 14:57:38 +0530

दि. २२/०४/२०२५
आटपाडी.

( आर. बी. कुलकर्णी )
सह न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,
आटपाडी